असा. क्र. ३ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, जानेवारी ६, २००९/पौष १६, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

### अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३.**—तुळजापूर विकास क्षेत्रासाठी योजना तयार करणे ; उक्त योजनेअनुसार उक्त क्षेत्रात करावयाच्या विविध विकासविषयक कामांची वेळेत अंमलबजावणी करणे आणि त्या प्रयोजनासाठी संबंधित शासकीय व निम-शासकीय अभिकरणांदरम्यान समन्वय राखणे ; त्यासाठी उक्त योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या कामांचे नकाशे व अंदाज तयार करण्यासाठी निदेश देणे ; विकासविषयक कामांचे प्रस्ताव आणि नकाशे व अंदाज यांना प्रशासकीय मान्यता देणे, संबंधित शासकीय व निम-शासकीय अभिकरणांनी या कामांसाठी मागवलेल्या निविदांना मान्यता देणे, निविदांच्या मान्यतेनंतर संबंधित अभिकरणांना शासकीय अनुदाने देणे व संबंधित शासकीय व निम-शासकीय अभिकरणांद्वारे करण्यात येणाऱ्या विकासविषयक कामांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे इत्यादी कामांकरिता तुळजापूर विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम . . १७-२४

दिनांक ५ जानेवारी २००९ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**  
सचिव,  
महाराष्ट्र शासन,  
विधी व न्याय विभाग.

---

**सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ” दिनांक ६ जानेवारी २००९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**तुळजापूर विकास क्षेत्रासाठी योजना तयार करणे ; उक्त योजनेअनुसार उक्त क्षेत्रात करावयाच्या विविध विकासविषयक कामांची वेळेत अंमलबजावणी करणे आणि त्या प्रयोजनासाठी संबंधित**

**शासकीय व निम-शासकीय अभिकरणांदरम्यान समन्वय राखणे ; त्यासाठी उक्त योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या कामांचे नकाशे व अंदाज तयार करण्यासाठी निदेश देणे ; विकासविषयक कामांचे प्रस्ताव आणि नकाशे व अंदाज यांना प्रशासकीय मान्यता देणे, संबंधित शासकीय व निम-शासकीय अभिकरणांनी या कामांसाठी मागवलेल्या निविदांना मान्यता देणे, निविदांच्या मान्यतेनंतर संबंधित अभिकरणांना शासकीय अनुदाने देणे व संबंधित शासकीय व निम-शासकीय अभिकरणांद्वारे करण्यात येणाऱ्या विकासविषयक कामांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे इत्यादी कामांकरिता तुळजापूर विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजाभवानी मंदिर हे भाविकांचे एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे ;

**आणि ज्याअर्थी,** या मंदिरात तसेच आसपासच्या परिसरातील इतर मंदिरांत भाविक मोठ्या संख्येने देवदर्शनासाठी येतात ;

**आणि ज्याअर्थी,** अशा मोठ्या संख्येने येणाऱ्या भाविकांसाठी मूलभूत सोयीसुविधांची तरतूद करण्याची आवश्यकता आहे आणि अशा मोठ्या प्रमाणात येणाऱ्या लोकांच्या दृष्टीने पर्याप्त ठरेल अशा प्रकारे सुनियोजित पद्धतीने तुळजापूर शहराचा विकास करण्याची गरज आहे ;

**आणि ज्याअर्थी,** तुळजापूरचा सुनियोजित विकास करण्याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने विविध विभागांशी व अभिकरणांशी संबंधित अशा बहुसंख्य कामांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे ;

**आणि ज्याअर्थी,** तुळजापूर नगरपरिषद क्षेत्राच्या व त्याच्या आसपासच्या परिसराच्या विकासाचे काम करणाऱ्या विविध अभिकरणांद्वारे अशा विविध विकासविषयक कामांची सुनियोजित रीतीने व उत्तम समन्वय साधून अंमलबजावणी करण्यासाठी विशेष विकास प्राधिकरण स्थापन करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व व्याप्ती.

**१.** (१) या अधिनियमास, तुळजापूर विकास प्राधिकरण अधिनियम, २००८ असे म्हणावे.

(२) तो, तुळजापूर नगरपरिषद क्षेत्र आणि तुळजापूर नगरपरिषदेच्या हद्दीपासून पाच किलोमीटरपर्यंतचे आसपासचे क्षेत्र यांस लागू असेल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) " सोयीसुविधा " यामध्ये मार्ग, रस्ता, पूल, दळणवळणाची इतर कोणतीही साधने, खुली जागा, उद्यान, मनोरंजन मैदान, क्रीडांगण, बाग, बाजार आणि साफसफाई, वाहनतळाची जागा, पाणीपुरवठा व वीज यांचा पुरवठा, रस्त्यावरील दिवे, जलनिस्सारण, मलनिस्सारण, शैक्षणिक व आरोग्यविषयक सुविधा, कोणतीही कल्याणकारी उपाययोजना आणि कोणतीही उपयोगिता, किंवा सेवा आणि राज्य शासनास विकास प्राधिकरणाशी विचारविनिमय करून, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, सोयीसुविधा म्हणून वेळोवेळी विनिर्दिष्ट करता येईल अशा कोणत्याही सोयीसुविधा या गोष्टी अंतर्भूत आहेत ;

(२) " अध्यक्ष " याचा अर्थ, तुळजापूर विकास प्राधिकरणाचा अध्यक्ष, असा आहे ;

(३) " सक्षम प्राधिकरण " यामध्ये, शासकीय व निम-शासकीय अभिकरणाचा जो अधिकारी त्याच्यासमोर सादर केलेल्या प्रस्तावांना त्याच्या कर्तव्याचा एक भाग म्हणून मंजुरी देण्यासाठी सक्षम आहे त्या अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(४) " विकास " याचा, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह अर्थ, कोणत्याही जमिनीतील किंवा जमिनीवरील किंवा जमिनीखालील (यात नदी, सरोवर यांखालील किंवा इतर कोणत्याही पाण्याखालील जमिनीचा समावेश होतो) बांधकामे, अभियांत्रिकी कामे, खाणकामे किंवा इतर कामे पार पाडणे अथवा कोणत्याही बांधकामामध्ये किंवा जमिनीमध्ये कोणतेही महत्त्वपूर्ण बदल करणे, असा आहे आणि त्यात, कोणत्याही जमिनीच्या विकासाचा, पुनर्विकासाचा तसेच आराखड्याचा व उप-विभागाचा आणि तसेच सोयीसुविधांच्या तरतुदीचा समावेश होतो आणि " विकास करणे " या संज्ञेचा अन्वयार्थ तद्नुसार लावण्यात येईल ;

(५) " विकास प्राधिकरण " याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले तुळजापूर विकास प्राधिकरण, असा आहे ;

(६) " विकास योजना " याचा अर्थ, तुळजापूर नगरपरिषदेच्या नगर हद्दीपासून पाच किलोमीटर पर्यंतच्या आसपासच्या क्षेत्रासाठी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींअन्वये तयार केलेली योजना, असा आहे ; (१९६६ चा महा. ३७.)

(७) " शासकीय अभिकरण " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा कोणताही विभाग किंवा कार्यालय, असा आहे ;

(८) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(९) " विनियम " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले विनियम, असा आहे ;

(१०) " निम-शासकीय अभिकरण " याचा अर्थ, राज्य शासनाने निर्माण केलेली कोणतीही वैधानिक किंवा अवैधानिक संघटना, निगम, प्राधिकरण, मंडळ किंवा शासकीय कंपनी, असा आहे ;

(११) " तुळजा भवानी मंदिर विश्वस्तव्यवस्था " याचा अर्थ, तुळजापूर येथील तुळजाभवानी देवीच्या मंदिराचा कारभार चालवण्यासाठी मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेली विश्वस्तव्यवस्था, असा आहे ; (१९५० चा मुंबई २९.)

(१२) " तुळजापूर विकास क्षेत्र " याचा अर्थ, तुळजापूर नगरपरिषद क्षेत्र, असा आहे आणि त्यात त्या क्षेत्राच्या आसपासच्या पाच किलोमीटरपर्यंतच्या परिसराचा समावेश होतो ;

(१३) " तुळजापूर विकास बृहत योजना " याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी राज्य शासनाने मंजूर केलेल्या तुळजापूर विकास क्षेत्राच्या विकासासाठीची योजना, असा आहे ;

(१४) " तुळजापूर विकास बृहत योजना क्षेत्र " याचा अर्थ, तुळजापूर नगरपरिषद क्षेत्र आणि तुळजापूर नगरपरिषदेचा नगर हद्दीपासून पाच किलोमीटरपर्यंतचे तिचे आसपासचे क्षेत्र, असा आहे.

## प्रकरण दोन

## विकास प्राधिकरणाची स्थापना

(विकास प्राधिकरणाची स्थापना व गठन करणे.)

**३.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची उद्दिष्टे व प्रयोजने साध्य करण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, " तुळजापूर विकास प्राधिकरण " या नावाने संबोधल्या जाणाऱ्या एका विकास प्राधिकरणाची स्थापना करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेले विकास प्राधिकरण हे अखंड परंपरा असणारा आणि एक सामाईक मुद्रा असणारा एक निगम निकाय असेल आणि निगम निकाय म्हणून असलेल्या त्याच्या नावाने त्याला किंवा त्याच्यावर दावा दाखल करता येईल. तसेच, जंगम व स्थावर अशा दोन्ही प्रकारच्या मालमत्तेबाबत करार करण्याचा, ती संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा आणि तिची विल्हेवाट करण्याचा आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करण्याचा त्याला अधिकार असेल.

(३) या विकास प्राधिकरणाचे मुख्यालय उस्मानाबाद येथे असेल आणि सर्वसाधारणपणे त्याच्या बैठका उस्मानाबाद येथे होतील. परंतु विकास प्राधिकरणाची निकड लक्षात घेऊन राज्यात इतरत्रदेखील कोणत्याही ठिकाणी त्याला बैठक घेता येईल.

विकास प्राधिकरणाची रचना.

**४.** विकास प्राधिकरणामध्ये पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल :—

(१) जिल्हाधिकारी, उस्मानाबाद जिल्हा . . . . पदसिद्ध अध्यक्ष.

(२) तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेला विधानसभा सदस्य. सदस्य.

(३) तुळजापूर नगरपरिषदेचा अध्यक्ष. . . . . सदस्य.

(४) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाच्या दोन नामांकित व्यक्ती. . . सदस्य.

(५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद. . . सदस्य.

(६) पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद. . . . . सदस्य.

(७) अधीक्षक-अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद. . . सदस्य.

(८) अधीक्षक-अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित,सदस्य. उस्मानाबाद.

(९) जिल्हा शल्यचिकित्सक, उस्मानाबाद. . . . . सदस्य.

(१०) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद. . . सदस्य.

(११) नगररचनाकार, उस्मानाबाद. . . . . सदस्य.

(१२) जिल्हा प्रकल्प अधिकारी (नगर विकास), जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद. सदस्य.

(१३) मुख्याधिकारी, तुळजापूर नगरपरिषद. . . . . सदस्य.

(१४) जिल्हा नियोजन अधिकारी, उस्मानाबाद. . . . . सदस्य-सचिव.

विकास प्राधिकरणाचे कामकाज.

**५.** (१) विकास प्राधिकरण, आपल्या बैठकीचे कामकाज चालविण्याच्या बाबतीत (अशा बैठकीच्या गणपूर्तीसह) विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीविषयक नियमांचे पालन करील.

(२) विकास प्राधिकरणाचा अध्यक्ष हा, विकास प्राधिकरणाच्या बैठकींचा अध्यक्ष असेल आणि जर कोणत्याही कारणास्तव अध्यक्ष, बैठकीस उपस्थित राहू शकणार नसेल तर, बैठकीस, उपस्थित असलेल्या सदस्यांनी आपल्यांमधून निवडलेला विकास प्राधिकरणाचा इतर कोणताही सदस्य अशा बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारील.

(३) पोट-कलम (१) अन्वये केलेल्या नियमांमध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, विकास प्राधिकरणाच्या कोणत्याही बैठकीमध्ये मांडलेल्या सर्व प्रश्नांवर उपस्थित असणाऱ्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात येईल आणि समसमान मते पडल्यास अध्यक्ष, किंवा त्यांच्या अनुपस्थितीत अध्यक्षस्थान स्वीकारणारी व्यक्ती, दुसरे किंवा निर्णायक मत देईल.

(४) बरोबरीच्या सर्व सदस्यांमध्ये अध्यक्षाचा प्रथम क्रमांक असेल आणि त्यास विकास प्राधिकरणाचे कामकाज चालन आणि प्रशासकीय बाबी यांचे सर्वसाधारण अधीक्षण व निदेशन करण्याचा अधिकार असेल आणि तो, विकास प्राधिकरण त्याला नेमून देईल त्याप्रमाणे, विकास प्राधिकरणाच्या इतर अधिकारांचा वापर करील व कार्ये पार पाडील.

**६.** विकास प्राधिकरणाची कोणतीही कृती किंवा कार्यपद्धती ही, केवळ,— रिक्त पद, इत्यादी, कारणांमुळे विकास प्राधिकरणाची कार्यपद्धती विधिअग्राह्य न ठरणे.

(क) विकास प्राधिकरणामध्ये कोणतेही पद रिक्त आहे किंवा विकास प्राधिकरणाच्या रचनेत कोणताही दोष आहे यामुळे ; किंवा

(ख) विकास प्राधिकरणाचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या नेमणुकीमध्ये कोणताही दोष आहे यामुळे ; किंवा

(ग) विकास प्राधिकरणाच्या कामकाजात कोणतीही अनियमितता आहे, तथापि, ती जर प्रकरणाच्या योग्यायोग्यतेस बाधा पोहचवत नसेल तर अशा अनियमिततेमुळे,

अवैध असणार नाही :

परंतु, कामकाजातील कोणतीही अनियमितता प्रकरणाच्या योग्यायोग्यतेस बाधा पोहचवते आहे किंवा नाही असा जर कोणताही प्रश्न उद्‌भवला तर, ते प्रकरण राज्य शासनाकडे पाठवण्यात येईल आणि त्यावरील त्यांचा निर्णय अंतिम असेल.

## प्रकरण तीन

## विकास प्राधिकरणाची कर्तव्ये, कार्ये आणि अधिकार

**७.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींना आणि त्या त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याला अधीन राहून, तुळजापूर विकास बृहत योजना क्षेत्राचा विकास करण्याकरिता एक बृहत योजना तयार करणे, त्याकरिता राज्य शासनाची मान्यता मिळविणे, तुळजापूर विकास बृहत योजनेमध्ये मान्यता मिळालेल्या विकास कामांची सुव्यवस्थित अंमलबजावणी करण्यासाठी त्यांचे विनियमन करणे, त्यांना चालना देणे व त्याची सुनिश्चिती करणे हे विकास प्राधिकरणाचे कर्तव्य असेल. विकास प्राधिकरणाची कर्तव्ये, कार्ये आणि अधिकार.

(२) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, विकास प्राधिकरणाची कर्तव्ये, कार्ये आणि अधिकार यांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश असेल,—

(क) तुळजापूर विकास बृहत योजना क्षेत्राच्या विकासाकरिता एक बृहत योजना तयार करणे ;

(ख) विकास योजना तयार करणे ; आणि त्यासाठी राज्य शासनाची मान्यता मिळविणे ;

(ग) तुळजापूर विकास बृहत योजनेमध्ये उद्दिष्ट ठेवलेल्या विविध विकासविषयक कामांचे तपशिलवार आराखडे, नकाशे व अंदाज तयार करण्याकरिता आणि त्यांची अंमलबजावणी करण्याकरिता संबंधित शासकीय व निम-शासकीय अभिकरणांची नियुक्ती करणे, त्यांच्या जबाबदाऱ्या विनिर्दिष्ट व निश्चित करणे ;

(घ) शासकीय व निम-शासकीय अभिकरणांनी त्यास सादर केलेल्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देणे ;

(ङ) मान्यता मिळालेल्या प्रकल्पाच्या कामांकरिता संबंधित शासकीय व निम-शासकीय अभिकरणांमार्फत निविदा मागविणे आणि त्यांना मान्यता देणे ;

(च) राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानांचे, निविदा मान्य झाल्यानंतर, संबंधित शासकीय व निम-शासकीय अभिकरणांना वाटप करणे ;

(छ) विकसित झालेली कामे, बांधकामे, उपयुक्त सेवा, इत्यादी पूर्ण झाल्यानंतर, तुळजापूर नगरपरिषद, पोलीस विभाग, तुळजाभवानी मंदिर विश्वस्तव्यवस्था, सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांसारख्या आणि त्यांच्यासारख्या इतर संबंधित अभिकरणांकडे हस्तांतरित करणे ;

(ज) तुळजाभवानी मंदिर विश्वस्तव्यवस्था आणि इतर अभिकरणे तुळजाभवानी मंदिरातील मुख्य वार्षिक यात्रेच्या प्रसंगी करावयाच्या व्यवस्था योग्यरीत्या करत असल्याबाबत खातरजमा करणे आणि त्यांचे संनियंत्रण करणे ;

(झ) तुळजापूर विकास बृहत योजनेखालील कामाची आखणी करणे, त्यास मंजुरी देणे, त्याची अंमलबजावणी करणे किंवा त्याचे संनियंत्रण करणे यांकरिता, विकास प्राधिकरणाचे कार्यालयीन काम किंवा अन्य कोणतेही काम पार पाडण्यासाठी, अंशकालिक किंवा पूर्णकालिक तत्त्वावर कोणत्याही शासकीय वा निम-शासकीय अभिकरणांच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या वा कर्मचाऱ्याच्या सेवा उपलब्ध करून देण्याची मागणी करणे :

परंतु, एकूण एका महिन्यापेक्षा अधिक कालावधीकरिता पूर्ण कालिक तत्त्वावर कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची सेवा आवश्यक असेल अशा बाबतीत, विकास प्राधिकरण, राज्य शासनाची पूर्वपरवानगी घेईल ;

(ञ) कोणत्याही शासकीय किंवा निम-शासकीय अभिकरणाकडे तुळजापूर विकास बृहत योजनेची किंवा तिच्या भागाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सोपवणे :

परंतु, अशा प्रकारे जबाबदारी सोपवलेल्या संबंधित शासकीय किंवा निम-शासकीय अभिकरणाने ती जबाबदारी त्यांच्या कार्यालयीन कर्तव्याचा भाग समजून पार पाडणे हे त्याचे कर्तव्ये असेल :

परंतु, आणखी असे की, तुळजापूर नगरपरिषद क्षेत्र व तिचे पाच किलोमीटरपर्यंतचे परिघीय क्षेत्र यामध्ये अशी कोणतीही जबाबदारी पार पाडण्यासाठी संबंधित शासकीय किंवा निम-शासकीय अभिकरणाकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

(३) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ४० च्या पोट-कलम (१ख) च्या अर्थांतर्गत, विकास प्राधिकरण हे एक प्राधिकरण असेल आणि तदनुसार, राज्य शासनाने या विकास प्राधिकरणाला तुळजापूर विकास क्षेत्रासाठीचे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित करणे हे कायदेशीर असेल. १९६६ चा महा. ३७.

प्रकरण चार

**अर्थसंकल्प, लेखे आणि लेखापरीक्षा**

अर्थसंकल्प, लेखे व लेखापरीक्षा.

**८.** (१) विकास प्राधिकरण, आपला आगामी वर्षाचा अर्थसंकल्प तयार करील व तो, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा दिनांकापर्यंत, राज्य शासनाला सादर करील.

(२) राज्य शासन, तुळजापूर विकास बृहत योजनेअंतर्गत मंजूर केलेल्या कामाकरिता विकास प्राधिकरणाला यथोचित विनियोजन करून आवश्यक ती अनुदाने देईल.

(३) विकास प्राधिकरण, उस्मानाबाद येथील शासकीय कोषागारामध्ये स्वीय खातेवही खाते उघडेल, विकास प्राधिकरणाचा अध्यक्ष व सदस्य-सचिव यांच्या नावाने संयुक्तपणे ते खाते चालविण्यात येईल.

(४) या अधिनियमाखालील विकास कामांकरिता खर्च करणे व अनुदानांचा वापर करणे याबाबतची कार्यपद्धती, राज्यशासनाच्या संबंधित वित्तीय नियमावली प्रमाणे असेल, आणि अशा कामांचा योग्य अभिलेख ठेवणे, या प्रयोजनासाठी राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा ठराविक कालांतरांनी विकास प्राधिकरणाला उप योजन प्रमाणपत्र सादर करणे, जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा तेव्हा लेखापरीक्षणांकरिता अभिलेख उपलब्ध करून देणे, ही संबंधित शासकीय व निम-शासकीय अभिकरणाची जबाबदारी असेल.

(५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये करण्यात आलेल्या खर्चाच्या संबंधातील विकास प्राधिकरणाच्या आणि शासकीय व निम-शासकीय अभिकरणांच्या लेख्यांचे स्थानिक निधी लेखा परीक्षा किंवा महालेखापाल यांच्या लेखापरीक्षकांकडून लेखापरीक्षण करण्यात येईल.

**९.** विकास प्राधिकरण, दरवर्षी एकदा, विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये व वेळेत, त्यांच्या मागील वर्षातील कामाचा गोषवारा देणारा (कामाची संक्षिप्त माहिती देणारा) वार्षिक अहवाल तयार करील आणि अशा अहवालाची एक प्रत राज्य शासनाला पाठवील. विकास प्राधिकरणाचा वार्षिक अहवाल.

**१०.** विकास प्राधिकरण, राज्य शासन आदेशाद्वारे त्याच्या कार्यासंबंधी जी माहिती मागवील ती माहिती राज्य शासनाला देईल. माहिती मागविण्याचा अधिकार.

प्रकरण पाच

**संकीर्ण**

**११.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) नियम प्रथमच केले असतील तेवढे खेरीज करून एरव्ही, या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन असतील.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो तयार करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहांचे एकमत झाले आणि त्यांनी तशा आशयाचा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित केला तर, असा निर्णय **राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात तो नियम अंमलात येईल किंवा, यथास्थिति, अंमलात येणार नाही ; तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

**१२.** विकास प्राधिकरणास, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेच्या अधीन राहून, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विकास प्राधिकरणाच्या मते, या अधिनियमाखालील त्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्याची कार्ये पार पाडण्यासाठी ज्यांसाठी तरतूद करणे आवश्यक आहे, अशा सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी, या अधिनियमाशी आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांशी सुसंगत असे विनियम करता येतील. विनियम करण्याचा अधिकार.

**१३.** (१) विकास प्राधिकरणाला, आपली कार्ये पार पाडीत असताना, लोकहित अंतर्भूत असलेल्या धोरणात्मक बाबींसंबंधात राज्य शासन त्याला जे लेखी निदेश देईल त्या निदेशांद्वारे मार्गदर्शन मिळेल. निदेश देण्याचा अधिकार.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला कोणताही निदेश हा, लोकहित अंतर्भूत असलेल्या धोरणात्मक बाबीशी संबंधित आहे किंवा कसे असा कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, राज्य शासनाचा त्यावरील निर्णय हा अंतिम असेल.

विकास प्राधिकरणाचे विसर्जन. **१४.** (१) ज्या प्रयोजनांसाठी या अधिनियमान्वये विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली होती ती प्रयोजने मोठ्या प्रमाणात साध्य झालेली आहेत याबाबत राज्य शासनाचे समाधान झाले असेल व त्यामुळे राज्य शासनाच्या मते, यापुढे विकास प्राधिकरण अस्तित्वात ठेवणे अनावश्यक असेल तर, राज्य शासनास, **राजपत्रातील** आदेशाद्वारे, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून, विकास प्राधिकरण विसर्जित करण्यात येईल, असे घोषित करता येईल, आणि त्यानुसार विकास प्राधिकरण विसर्जित करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) खालील आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या उक्त दिनांकापासून,—

(क) विकास प्राधिकरणाकडे निहित असतील, किंवा विकास प्राधिकरणाकडून संपादित करण्यायोग्य असतील अशा सर्व मालमत्ता, निधी आणि देणी, शासनाकडे निहित होतील, किंवा त्या सर्व, शासनाकडून संपादित करण्यायोग्य असतील ;

(ख) विकास प्राधिकरणाविरुद्ध अंमलबजावणीयोग्य असलेली सर्व दायित्वे, शासनाविरुद्ध अंमलबजावणी योग्य असतील.

(३) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार. **१५.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास राज्य शासनाला, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून अशी अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल व या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.